तात्काळ प्रथम प्राधान्य
कालमर्यादीत

क्र/१२५१/आमा.शि/आ.मा.शि./अमंलबजावणी/२२४
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय
दिनांक :१९/११/२०१८

10640

19 NOV 2018

प्रति,
१) संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद , सदाशिव पेठ
पुणे -३०

२) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

विषय : महाडीबीटी पोर्टल वर नव्याने कनिष्ठ महाविद्यालयाची व अध्यापक विद्यालयाची नावे (डी.एड) समाविष्ठ करण्याबाबत

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कनिष्ठ महाविद्यालयाची नावे सरल प्रणाली मार्फत महाडीबीटी पोर्टल वर घेण्यात आली आहेत. तथापि काही कनिष्ठ महाविद्यालयाची नावे व अध्यापक विद्यालयाची नावे महाडीबीटी पोर्टल वर समाविष्ट करण्यासाठी संचालनालयास काही महाविद्यालयांकडून विनंती करण्याबाबतची पत्रे प्राप्त होत आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयाची नावे व अध्यापक विद्यालयाची नावे महाडीबीटी पोर्टल वर समाविष्ट करण्यासाठी www.mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावर संचालनालयासाठी टॅब (युजर आयडी व पासवर्ड) उपलब्ध करुन दिला आहे. तथापि विहित कालावधीत नावे समाविष्ठ करावयाची प्रक्रिया करावयाची असल्याने संचालनालास देण्यात आलेला सदर युजर आयडी **SEDSupAdmin** व पासवर्ड **Nitin@123** आपणास देण्यात येत आहे . सदर युजर आयडी व पासवर्ड दिनांक ३०/११/२०१८ पर्यत अधिकृत राहणार आहे.

ज्या कनिष्ठ महाविद्यालयाची नावे व अध्यापक विद्यालयाची नावे महाडीबीटी पोर्टल वर नाहीत त्यानी वर नमूद केलेल्या युजर आयडी व पासवर्ड व्दारे पोर्टलवर नावे समाविष्ठ करुन घ्यावीत.त्यासाठी महाडिबीटी मार्फत नियुक्त केलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर मार्फत कार्यवाही करावी ज्या ठिकाणी डाटा एन्ट्री ऑपरेटर हजर झालेले नाहीत त्या ठिकाणी महाडीबीटी साठी नियुक्त केलेल्या नोडल ऑफीसर मार्फत कार्यवाही करावी.

आपल्या कार्यक्षेत्रातील अध्यापक विद्यालयाची नावे व कनिष्ठ महाविद्यालयाची नावे महाडीबीटी पोर्टल वर समाविष्ठ केल्यानंतर सबंधित कॉलेजच्या लॅगीन आयडीवर युजर आयडी व पासवर्ड जातात. त्याव्दारे सबंधित कनिष्ठ महाविद्यालय व अध्यापक विद्यालयांनी स्वतःची प्रोफाईल तयार करुन पुढील कार्यवाही करावयाची आहे. अध्यापक विद्यालयाची नाव समाविष्ठ करताना सबंधित अध्यापक विद्यालयाने युडायस क्रमांका ऐवजी एनसीटीइ ( **NCTE**) चा क्रमांक नमूद करावा. **याबाबत तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.**

(गंगाधर म्हमाणे)
शिक्षण संचालक
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण संचालनालयास,म.रा.पुणे-१

प्रत : मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय,म.रा.पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
नेहा हुमरसकर, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.